# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २३ | बुधवार, दि.१३ ते १९ मे २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## नीट पेपरफुटीचे नाशिक कनेक्शन; एक जण ताब्यात, सीबीआय करणार तपास

**नाशिक**–नीट युजी २०२६ च्या पेपरफुटीच्या चौकशीला आता वेग आला असून, या प्रकरणाचे धागेदोरे नाशिक पर्यंत पोहोचले आहेत. तपास यंत्रणांनी एका संशयिताला ताब्यात घेतल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पेपरफुटीचा हा कट अनेक राज्यांमध्ये पसरलेला असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने आता ही संपूर्ण परीक्षा रद्द करून सीबीआय चौकशीची घोषणा केली आहे.

राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षाच्या प्रश्नपत्रिका फुटल्याने देशभरातील वातावरण तापले असतानाच, नाशिकमधील इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका व्यक्तीला पकडण्यात आले आहे. राजस्थान पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणा या संशयिताची सध्या कसून चौकशी करत आहेत. या कारवाईमुळे पेपरफुटीच्या रॅकेटचे जाळे नाशिकमध्ये किती खोलवर रुतलेले आहे, हे आता समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.पेपरफुटीचा हा गंभीर प्रकार उघड झाल्यानंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ३ मे रोजी झालेली परीक्षा तातडीने रद्द करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून केंद्र सरकारने आता या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. यामुळे या आंतरराज्यीय रॅकेटमधील मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहचणे तपास यंत्रणांना सोपे जाणार असून, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांवर कडक कारवाईची अपेक्षा केली जात आहे.

राजस्थान पोलिसांच्या एसओजी टीमने केलेल्या प्राथमिक तपासात या महाघोटाळ्याचे केंद्रस्थान केरळ असल्याचे समोर आले आहे. चुरू येथील एक उमेदवार, जो केरळमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत आहे, त्याने सीकर मधील एका पीजी समन्वयकाला एक गेस पेपर पुरवला होता, जो प्रत्यक्षात लीक झालेली प्रश्नपत्रिका असल्याचे सिद्ध झाले. या संदर्भात डेहराडून मधूनही काही संशयितांना जेरबंद करण्यात आले असून, तपासाची व्याप्ती आता वाढली आहे.६ मे रोजी तात्पुरती उत्तरतालिका जाहीर झाली असली, तरी परीक्षेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने आता जून महिन्यात फेरपरीक्षा घेतली जाण्याची शक्यता आहे. सध्या सीयूईटी युजी २०२६ ची प्रक्रिया ३० मे पर्यंत सुरू असल्यामुळे आणि परीक्षा केंद्रांच्या नियोजनातील अडचणींमुळे मे महिन्यात परीक्षा घेणे अशक्य आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी आता अधिक सक्षम तांत्रिक यंत्रणेसह जूनमध्ये ही परीक्षा आयोजित करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा संपादन करण्याचा प्रयत्न करेल.

## ५,४५९ पोलिसांच्या घरांसाठी १,७६८ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई**–राज्यातील पोलीस दलासाठी गृहनिर्माण क्षेत्रात मोठा आणि दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देत पोलिसांच्या हक्काच्या घरासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

राज्य सरकारने पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी १,७६८.०८ कोटी रुपयांच्या निधीला हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे अनेक दिवसांपासून घरकुलांचे प्रस्ताव प्रलंबित होते. या निर्णयामुळे एकूण ५,४५९ पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काच्या घरासाठी आर्थिक बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियाद्वारे या निर्णयाची माहिती देत पोलिसांच्या कल्याणासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे नमूद केले.

याचवेळी त्यांनी मागील सरकारवर टीका करताना सांगितले की, २०१४ ते २०१९ या काळात राबवण्यात आलेली व्याजसवलत अनुदान योजना महाविकास आघाडीच्या काळात बंद करण्यात आली होती. मात्र, विद्यमान सरकारने ही योजना पुन्हा सुरू करून पोलिसांच्या घरांच्या प्रश्नाला प्राधान्य दिले आहे.

## बँक संचालक दुर्गाप्रसाद ठाकरेच्या फिल्मी स्टाईल हिमतीने कुख्यात चोराला ठोकल्या बेड्या!

### – आरोपी चोराकडून दुर्गाप्रसाद ठाकरे यांच्यावर चाकू हल्ला
### – जीवाची पर्वा न करता चोराला पकडले; सर्वच स्तरावरून होत प्रशंसा

**गोंदिया** – घरात चोरी करण्यासाठी आलेल्या चोराला घरी कुणीतरी येण्याचा आवाज ऐकू आल्यानंतर पडून जाण्याच्या प्रयत्न करीत असताना त्या चोश्राचा पाठलाग करून पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र अंधाराचा फायदा घेत चोर पसार झाला. मात्र थोड्या वेळातच घराशेजारी महिलेचा आवाज ऐकू आल्यानंतर पुन्हा त्या घराकडे धाव घेत कुख्यात चोराला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. फिल्मी कथानकाला ही लाजवेल अशी घटना गोंदिया शहरालगत कुडवा परिसरात ३ मे रोजी पहाटे दरम्यान घडली. जीवाची पर्वा न करता चोराला पकडून देणारे जीडीसीसी बँकेचे संचालक दुर्गाप्रसाद ठाकरे यांच्या धैर्याची मात्र चर्चा जिल्ह्यात होत आहे.

दुर्गाप्रसाद ठाकरे हे कॅटरिंग व्यवसायात असून नेहमीप्रमाणे ते आपले काम आटोपून २ मे रोजी रात्री उशिरा घरी आले असता त्यांच्या घरात चोर शिरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता चोराला पकडण्याचा प्रयत्न केला. चोराला



पकडण्याच्या प्रयत्नात घरचे मंडळी जागी झाली तोवर चोर पडून जाण्यात यशस्वी झाला होता. मात्र थोड्या वेळातच घराशेजारी असलेल्या ठाकरे कुटुंबियांच्या घरातून ङ्क चोर गळा दाबत आहे, वाचवा, वाचवा.....चोर... चोर...ङ्क असा आवाज आल्याने क्षणाचाही विलंब न करता दुर्गाप्रसाद ठाकरे हे आपला मुलगा, घरातील एक कर्मचारी यांच्यासोबत त्या घराच्या दिशेने धावले. दुर्गाप्रसाद ठाकरे यांनी कुणाची कसलीही वाट न बघता चोराला घट्ट पकडले. चोरासोबत झटापट झाली, तरीही दुर्गाप्रसाद यांनी त्याला सोडले नाही. चोर झटापटीत पळून जाण्याच्या प्रयत्न करीत असताना दुर्गाप्रसाद यांनी त्याच्या पायाला घट्ट पकडून ठेवले. अखेर चोराला निसटण्याचा मार्ग न सापडल्याने त्याने आपल्याजवळील धारदार शस्त्राने (चाकू) दुर्गाप्रसाद यांच्यावर वार केला. तरीही त्यांनी जीवाची पर्वा न करता चोराचे वार झेलत अखेरपर्यंत त्याला पकडून ठेवले. तरीही चोराच्या चाकूचे घाव त्यांच्या पाठीवर लागल्याने ते जखमी झाले. तोपर्यंत आजूबाजूचे इतर लोक गोळा झाल्याने व दुर्गाप्रसाद ठाकरे यांनी चोराला पकडून ठेवल्याने अखेर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. कुख्यात चोराचे नाव नागपूर कळमना निवासी नरेश अंकालू महिलांगे (३०) असे असून त्याच्याकडून साडे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे दुर्गाप्रसाद ठाकरे हे भाजप चे जिल्हा पदाधिकारी असून गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आहेत. तरीही त्यांनी कसलीही जीवाची पर्वा न करता चोराच्या मागे धावत त्याला पकडून देत बहादुरीचा परिचय दिल्याने त्यांची प्रशंसा केली जात आहे.

## उलटलेल्या ट्रकला ट्रॅव्हल्सची धडक, एक ठार, १० प्रवासी जखमी



**गोरेगाव:** गोंदिया–कोहमारा राष्ट्रीय महामार्गावर गोरेगावजवळील जानाटोला परिसरात मंगळवारी पहाटे घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. रस्त्याच्या मधोमध रात्रीपासून उलटून पडलेल्या ट्रकला भरधाव ट्रॅव्हल्सची जोरदार धडक बसल्यानंतर ट्रॅव्हल्स थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात उलटली. या भीषण अपघातात एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला असून दहा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

मृत प्रवाशाचे नाव फुलेल सनंनलाल खिरवार (वय ३०, रा. आमगाव, ता. सालेवारा, जि. खैरागड, छत्तीसगड) असे असून तो ट्रॅव्हल्समधून प्रवास करीत होता. अपघाताच्या वेळी तो गाढ झोपेत असल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक झालेल्या जोरदार धडकेत त्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, कुकूस (धानाचा कोंडा) भरून कोहमाराकडून गोंदियाच्या दिशेने येत असलेला ट्रक क्रमांक एमएच ४० वाय ४५९३ सोमवारी रात्री सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास जानाटोला परिसरातील पेट्रोल पंपासमोर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या मधोमध उलटला. सुदैवाने या पहिल्या अपघातात चालक आणि वाहक थोडक्यात बचावले; मात्र ट्रक पूर्णपणे महामार्गाच्या मध्यभागी आडवा पडल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला होता.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अपघातानंतर तब्बल अनेक तास ट्रक रस्त्याच्या मधोमध उलटलेल्या अवस्थेत पडून होता. मात्र घटनास्थळी वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक बॅरिगेट्स, रेडियम सिग्नल किंवा सतर्कता फलक लावण्यात आले नव्हते. यामुळे रात्री व पहाटेच्या अंधारात येणाऱ्या वाहनचालकांसाठी हा ट्रक अक्षरशः मृत्यूचा सापळाच ठरला.

दरम्यान, मंगळवारी पहाटे सुमारे ५.३० वाजता हैदराबादहून गोंदियाकडे प्रवासी घेऊन येत असलेली ट्रॅव्हल्स क्रमांक एमपी ५० झेड ४९५८ भरधाव वेगात जानाटोला परिसरात पोहोचली. महामार्गाच्या मध्यभागी उलटलेला ट्रक अचानक समोर दिसताच ट्रॅव्हल्स चालकाने वाहन बाजूने काढण्याचा प्रयत्न केला. मात्र वेग अधिक असल्याने ट्रॅव्हल्सची ट्रकला जोरदार धडक बसली. धडकेनंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रॅव्हल्स थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात जाऊन उलटली.

अपघात इतका भीषण होता की ट्रॅव्हल्समधील प्रवासी एकमेकांवर आदळले. अनेक प्रवासी सीटमधून फेकले गेले तर काही वाहनाखाली दबले गेले होते. घटनास्थळी काही काळ हाहाकार माजला होता. प्रवाशांच्या किंकाळ्यांनी परिसर दणाणून गेला. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमींना बाहेर काढण्यास मदत केली.

या अपघातात हंसराज टोरीलाल नवदाने (४३), पंचफुला नवदाने (४०) रा. चांदीटोला, चेंबूरलाल कलपुरे (३४) रा. भिमोडी, मुनेश्वरी देशमुख (४३) रा. लांजी (मध्य प्रदेश), राकेश कांबळे (३५), मुनीतत्न पंचेश्वर (५५), बिहारीलाल पंचेश्वर (४३) सर्व रा. सिंघारपुरी, रीतू सिंघनकुळे (२२), सावित्री पंचीतिलक (२९) रा. भेलवाटोला तसेच सुखवतीबाई दमाहे हे दहा प्रवासी जखमी झाले आहेत.

गोरेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी गोंदिया येथील शासकीय व खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच गोरेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले तसेच दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्याची कार्यवाही करण्यात आली.गोरेगाव पोलिसांनी घटनेची नोंद केली असून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

## ओबीसींचे बेमुदत साखळी उपोषण सुरू




**भंडारा :–** सरकारने केंद्रीय मंत्री मंडळात ३० एप्रिल २०२५ रोजी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचा घेतलेला निर्णय कायम ठेवावा. ओबीसींची (ओबीसी, व्हीजे/एनटी, एसबीसी) जातनिहाय जनगणना करावी. जनगणना २०२७ मधील प्रश्न क्रमांक १२ मध्ये एससी व एसटी प्रवर्गाप्रमाणेच ओबीसींचाही उल्लेख असावा. या मागण्यांसाठी मजय संविधान, जय ओबीसीफचा नारा देत ओबीसी संघर्ष समिती, जिल्हा भंडारा यांच्या वतीने ११ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषणाला प्रारंभ करण्यात आला.

लोकसभेच्या विशेष अधिवेशनात खासदार धर्मेंद्र यादव यांनी जेव्हा जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम नसल्याचा प्रश्न उपस्थित केला, तेव्हा गृहमंत्री अमित शहा यांनी 'पहिल्या टप्प्यात घरांची गणना होत आहे आणि घराला जात नसते', असे उत्तर देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, प्रत्यक्षात जनगणनेच्या पहिल्या टप्प्याच्या प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये सरकारचा लबाडपणा आता स्पष्ट झाला असल्याची माहिती साखळी उपोषणाच्या पहिल्याच दिवशी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली.

ओबीसींवर होणारा अन्याय आता सहन करण्यापलिकडे गेला आहे. मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहिल, असा इशारा दिला आहे. ओबीसींच्या मागण्या पूर्ण होत नसल्याने १६ मे २०२६ पासून सुरु होणाऱ्या जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून जिल्हाभरात 'लढा ओबीसी जनगणनेचा, जनगणना २०२७ मध्ये ओबीसी चा कॉलम नाही म्हणून आमचा जनगणनेत सहभाग नाही' या आशयाच्या सुमारे ५० हजार पाट्या घरोघरी लावण्यात आल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

### मागासलेल्या ओबीसींवर अन्याय का?

**शासन दर १० वर्षांनी पशुंची जनगणना करते. जनावरांची संख्या किती याची आकडेवारी लक्षात घेत पुढील धोरणात्मक नियोजन करते. परंतु, हाडामासाची माणसे असलेल्या व आर्थिक, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या ओबीसींची या देशात जनगणना होत नाही, दिलेली आश्वासने पाळली जात नाही.**

### जिल्हाधिकारी यांनी केली संघर्ष समितीशी चर्चा

**साखळी उपोषणाच्या पहिल्याच दिवशी निवेदन देण्यासाठी गेलेल्या ओबीसी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांशी जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी चर्चा केली. शासनस्तरावर तातडीने माहिती पाठविण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी शिष्टमंडळाने जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.**

## घोटी,गोरेगावचा जनगणनेवर बहिष्कार

**गोरेगाव:–** तालुक्यातील गोरेगाव शहर, घोटी गावामध्ये सुरू असलेल्या जनगणनेवर बहिष्कार या सामाजिक जनजागृती मोहिमेला आता तरुण वर्गाचा मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे. समाजाच्या विविध मागण्या, हक्क आणि अस्तित्वाच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी युवक काँग्रेस गोरेगाव तालुका व गोरेगाव शहरच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

घोटी गावात आयोजित बैठकीत युवक काँग्रेसचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित होण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. समाजाच्या हक्कासाठी आणि अस्तित्वासाठी एकजूट आवश्यक आहे, असे युवक काँग्रेसचे कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते मो. सादिलहुसैन कुरैशी यांनी केले. तसेच समाजातील दुर्लक्षित घटकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन आणि जनजागृती करणे काळाची गरज आहे.

जनगणनेच्या माध्यमातून समाजाची खरी परिस्थिती आणि संख्या शासनासमोर यावी, यासाठी योग्य धोरणांची आवश्यकता असून समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच हा बहिष्कार आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेदरम्यान युवकांनी गावात फिरून नागरिकांशी संवाद साधला. समाजातील विविध प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, मूलभूत सुविधा आणि सामाजिक प्रतिनिधित्व या विषयांवर चर्चा करण्यात आली. युवक वर्गाने एकजूट ठेवून समाजहितासाठी लढण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या जनजागृती मोहिमेत युवक काँग्रेस गोरेगावचे देवा ठोकूर, संदीप वंजारी, अक्षय लाजेवार, दादू नांदगाये यांच्यासह




अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यकत्यांनी गावातील नागरिकांना त्यांच्या अधिकारांबाबत जागरूक करण्याचे काम करत आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त केला.

घोटी गावातील या उपक्रमामुळे परिसरात सामाजिक आणि राजकीय स्तरावर चर्चांना उधाण आले असून तरुणाचा सहभागामुळे आंदोलनाला अधिक बळ मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. समाजाच्या प्रश्नांवर तरुणांनी घेतलेली भूमिका आणि दाखवलेली एकजूट ही भविष्यातील सामाजिक चळवळींसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

## विदर्भात तापमान वाढीचा धोका

**नागपूर**–दिवसेंदिवस राज्यातील तापमानात मोठी वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.बहुतांश जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात पुढील ३ दिवस उष्णतेची लाटेचा इशारा देण्यात आला आहे. बहुतांश जिल्ह्याना उन्हाचा येलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती पुणे हवामान विभागाकडून सांगण्यात आली आहे. येत्या चार ते पाच दिवसांत तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्याच्या उत्तरार्धात विदर्भात पुन्हा एकदा तीव्र उष्णतेच्या लाटेचा फटका बसण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सध्या विदर्भात उष्णतेच्या लाटेसाठी पोषक वातावरण तयार झाले असून, "वेस्टर्न डिस्टर्बन्स'चा प्रभाव कमी होत चालल्याने उत्तरेकडील राज्यांतून गरम वारे वाहू लागले आहेत. त्याचा थेट परिणाम विदर्भाच्या तापमानावर होत असून, पुढील काही दिवसांत तापमानात तब्बल ४ ते ६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे विदर्भातील अनेक भागांमध्ये पारा पुन्हा ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची दाट शक्यता आहे.

## आंतरराज्यीय गांजा तस्करी करणाऱ्या चौघांना अटक

**गोंदिया :–** रेल्वेमधून अवैधरित्या तस्करीचा प्रकार सुरू आहे. यावर रेल्वे प्रशासनाच्या वतीने अनेकवेळा कारवाई करून प्रतिबंध करण्याचा प्रयोग करण्यात येतो. मात्र अवैध व्यवसायीक एवढे गब्बर झाले आहे की, हा प्रकार सुरूच आहे. अशातच ८ मे रोजी आरपीएफ नागपूर विभागाच्या विशेष पथकाने सालेकासा आणि गोंदिया दरम्यान धावणाऱ्या १२८८० क्रमांकाच्या भुवनेश्वर–एलटीटी एक्सप्रेसच्या जनरल कोचमध्ये तपासणी मोहीम राबवली. दोन ट्रॉली बॅगमधून अंदाजे १६. ३७४ किलो गांजाची अवैध वाहतूक करतांना दिसून आला. एकंदरीत दोन घटनेत चार आरोपींनी अटक करून एकूण २४ लाखाचा गांजा जप्त करण्यात आला.

सविस्तर असे की, आरपीएफ चे पथक तपासावर असतांना सालेकसा–गोंदिया मार्गावर धावणाऱ्या एलटीटी एक्सप्रेसमध्ये तपासादरम्यान रॉकी कुमार, रा. रामपूर ताराडीह, (बिहार), आणि सनातन भोई रा. बेलपहार, जिल्हा झारसुगुडा (ओडिशा) यांना ताब्यात घेवून त्यांची चौकशी केली असता, दोन ट्रॉली बॅगमधून अंदाजे १६. ३७४ किलो गांजाची अवैध वाहतूक करत असताना अटक करण्यात आली. या गांजाचे अंदाजित मूल्य ८,१८,७०० आहे. आवश्यक कायदेशीर कार्यवाहीनंतर, आरोपी आणि जप्त केलेला माल जीआरपी गोंदियाच्या ताब्यात देण्यात आला.

तर दुसऱ्या घटनेत ९ मे रोजी विभागीय कृती दलाने गोंदिया आणि नागपूर दरम्यान धावणाऱ्या ट्रेन क्रमांक १२८४३ पुरी–अहमदाबाद एक्सप्रेसची विशेष तपासणी केली. तपासणीदरम्यान, कान्हान आणि नागपूर दरम्यान एसी कोच ए–१ च्या बर्थ क्रमांक ४० वर प्रवास करणाऱ्या दोन संशयित व्यक्तींच्या दोन पिट्टू बेंग आणि दोन ट्रॉली बॅग तपासण्यात आली. त्यात गांजा असल्याचे स्पष्ट झाले. परिणामी श्रीहर्ष मोहंती, रा. उधना (गुजरात), आणि सिपुनगौडा, रा. नुवागाव, गंजम जिल्हा (ओडिशा) असे आरोपींची नाव असून त्यांना अटक करण्यात आली. व त्यांच्याकडून ५२.०४ किलो गांजा किंमत २६,०२,००० जप्त करण्यात आला. शिवाय तीन मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

दोन्ही घटनेत एकूण ३४ लाख ३८७ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींवर एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### 'ऑपरेशन नार्कोस' अंतर्गत कारवाई

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभागाचे रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ), मऑपरेशन नार्कोसफ अंतर्गत अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सातत्याने सघन मोहीम राबवत आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर येथील रेल्वे संरक्षण दलाचे विभागीय सुरक्षा आयुक्त, दीप चंद्र आर्य यांच्या निर्देश आणि मार्गदर्शनाखाली, रेल्वेमार्गे प्रतिबंधित अमली पदार्थ, दारू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतुकीत सामील असलेल्यांना पकडण्यासाठी राज्य पोलीस आणि इतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या समन्वयाने विशेष मोहीम राबवली जात आहे.**

## गोंदियाच्या तरुणाईला सट्ट्याची वाळवी

**गोंदिया :–** राईस सिटी म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील तरूणाई ऑनलाईन जुगार आणि सट्टचाच्या विळख्यात सापडली आहे. आतातर आयपीएलच्या नावाखाली सट्ट्याचा हा गोरखधंदा शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. खेळ खेळापुरता मर्यादित राहिलेला नसून आर्थिक उलाढाल आणि वाममार्गाकडे नेणारा ठरत आहे. आयपीएल क्रिकेट स्पर्धेचा हंगाम अर्ध्यावर आला असताना, जिल्ह्यात अवैध सट्टेबाजीने रौद्र रूप धारण केले आहे. गल्लीबोळातील टपऱ्यांपासून ते आलिशान हॉटेल्सपर्यंत सट्टेबाजांचे जाळे पसरले आहेत. यात जिल्ह्यातील कणा समजला जाणारा तरुण वर्ग उद्ध?वस्त होण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे.



मात्र, या साऱ्या प्रकाराकडे पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची संतप्त भावना नागरिकांमध्ये उमटत आहे.

मागील अनेक दिवसांपासून ऑनलाईन जुगाराचे जाळे घट्ट होताना दिसून येत आहेत. हा गोरखधंदा करणारेही आपली रणनिती आखून युवा पिढीला जाळ्यात आहेत. ओढत आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच जुगाराचे नवनवे फंडे काढून आपला गोरखधंदा चांगल्या पध्दतीने फुलवताना अवैध व्यवसायिक दिसून येत आहेत. आता तर आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर मोठा जुगार खेळला जात असल्याची शहरात चर्चा आहे. बुकींकडून जाळे तयार करून मोठ्या महानगरापासून जिल्ह्यात तार जुळल्याचे बोलले जात आहे.

या सर्व प्रकार छुप्या पध्दतीने सुरू असूनही पोलिस प्रशासनाला कल्पना नाही का? असा प्रश्न सुज्ञ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पोलिसांची धाड पडण्याची भीती असल्याने सट्टेबाजांनी आता आपली रणनीती बदलली आहे. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, शहरातील बडे बुकी आता ग्रामीण भागातील शेतशिवारे, निर्जन टेकड्या आणि जंगलाचा परिसर सुरक्षित आश्रयस्थान म्हणून वापरत आहेत. इतकेच नाही तर, पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी धावत्या चारचाकी वाहनांमध्ये लॅपटॉप आणि अत्याधुनिक मोबाईल सॉफ्टवेअरद्वारे लाखो रुपयांची उलाढाल केली जात आहे. 'मोबाईल नेटवर्क जिथे स्ट्राँग, तिथे सट्टेबाजांचा राबता' असे नवे समीकरण जिल्ह्यात पाहायला मिळत आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे, समाजात प्रतिष्ठित म्हणून वावरणारे काही चेहरे या सट्टा बाजाराचे सूत्रधार असल्याची चर्चा आहे. या बुकींचे मनोबल इतके उंचावले आहे की, त्यांना कायद्याची कोणतीही भीती उरलेली नाही. दररोज लाखो रुपयांची हार–जित होत असताना, पोलिसांनी केलेली किरकोळ कारवाई ही केवळ मसाहेबांना दाखवण्यासाठीफ केली जाते की काय, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे. गल्लीबोळातील टपऱ्यांपासून ते आलिशान हॉटेल्सपर्यंत सट्टेबाजांचे जाळे पसरले जात असून तरूणपिढी यात ओढली जात आहे. लोभापायी तरूण उध्वस्त होत असून मोठी सामाजिक समस्या निर्माण होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याकडे लक्ष देवून कायद्याचा वचक निर्माण करून जुगार खेळिवणाऱ्यांची पाळेमुळे खोदून काढावी, अशी मागणी सुज्ञ नागरिक व पालकांकडून केली जात आहे.

## संपादकीय

# उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे.

राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे.

शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ॅ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे.

महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे.

आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

# दुसऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकूण १३,६५५ प्रकरणांचा यशस्वी निपटारा

**गोंदिया:-** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले सामोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नहाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशान्वये ए. एस. प्रतिनिधी, प्र. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली तसेच एन. के. वाळके, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली शनिवारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे तसेच जिल्हयातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये तडजोड पात्र न्याय प्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँका तसेच लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १३,६६५ प्रकरणांचा यशस्वी निपटारां करण्यात आला. यावेळी पक्षकारांनी केले समाधान व्यक्त

ए. एस. प्रतिनिधी, प्र. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा त्र सत्र न्यायाधीश, यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ए. एस. प्रतिनिधी, जिल्हा न्यायधीश-१ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, एम. टी. असीम, जिल्हा न्यायधीश-२ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, के. एन. गौतम, जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, ए. सी. खुराणा, जिल्हा न्यायाधीश- ४, तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, एम. जे. मोहोड, मुख्य न्यायदंडाधिकारी, एस. व्ही. चरडे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, एस. व्ही. चरडे, प्र/५ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, श्रीमती टी. व्ही. गवई, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, एस. ए. शेंडगे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, व्ही.एच.शेंडे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, व्ही. एच. शेंडे, प्र/४ थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, एस.ओ.बोरकर, अध्यक्ष गोंदिया जिल्हा बार असोसिएशन, जि. गोंदिया व न्यायीक कर्मचारी वृंद, पक्षकार वर्ग, वकील वर्ग यांचे प्रमुख उपस्थितीत लोकन्यायालयाचे



उद्घाटन, ए.एस.प्रतिनिधी, प्र. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ए. एस. प्रतिनिधी, प्र/अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया यांनी लोक अदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच एन. के. वाळके, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन केले.

**पक्षकारांनी केले समाधान व्यक्त**

लोक अदालतीत निकाली काढण्यात आलेले प्रकरणे शनिवारी झालेल्या लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेल्या न्यायालयात प्रलंबीत प्रकरणांपैकी ११३ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली व रू. १,९८,४७,७१४/- रूपयांची वसुर्ल झाली. पुर्वन्यायप्रविष्ठ ४८,७४५ प्रकरणांपैकी १३,५४२ प्रकरणे निकाली काढण्यात आलो व यामध्ये रू. १,७१,३०,८९१/- रूपयांची वसुली झाली.

असे एकुण ५३,३०७ ठेवलेल्या प्रकरणापैकी १३,६५५ प्रकरणे निकाली काढण्यात आली व एकुण रू. ३,६९,७८,६०५/- (तीन करोड एकोनसत्तर लाख अठ्ठयात्तर हजार सहाशे पाच फक्त) एवढी वसुली झाली.

त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव्ह अंतर्गत जिल्हयातील न्यायालयामध्ये एकूण ११२ फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ९५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच १३८४ पेट्टी प्रकरण (प्लीड गिल्टी प्रकरणे) ठेवण्यात आली त्यापैकी ८९३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे बऱ्याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले आहे. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे महावितरणचे तसेच विद्युत, पाणी, टेलीफोन, बॅक रीकव्हरी यांचे पूर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधित विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरीता गोंदिया येथील एम. टी. असोन, जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, गोंदिया, एम. जे. मोहोड, मुख्य न्यायदंडाधिकारी गोंदिया, श्रीमती टी. व्ही. गवई, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर गोंदिया, एस. व्ही. चरडे, ४थे सह दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर, गोंदिया, के. व्ही. शेंडे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गोंदिया, व्ही. एच. शेंडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गोंदिया, जिल्हा वकील संघ, इतर पदाधिकारी तसेच पॅनलवरील वकील अॅड. श्री. मयंक गुप्ता, अॅड. श्री. कुणाल गणवीर, अॅड. कु. दिव्या डहाके, अॅड. श्रीमती सुचना चवरे, यांनी सहकार्य केले.

सदर लोकअदालतीचे यशस्वी आयोजनाकरीता ए. आर. कुकडे, प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गोंदिया, एम. पी. पटले, एन. पी. गोखले, पी. एन. गजभिये, आर. ए. सोनकुसरे, कु. पी. डी. जंगठे, व्ही. व्ही. जाधव, एन. सी. शहरे, आर. के. पंधरे तसेच रोहित मेंढे, शिपाई, एन. बी. बहादुरे, बेलिफ व पॅरा लिगल व्हांलटीअर्स, गोंदिया तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# जिल्हा नियोजन समितीचा नऊ कोटींचा कारभार वादाच्या भोवऱ्यात

**नवेगावबांध:-** जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांसाठी जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या नऊ कोटींच्या निधीवरून आता राजकीय आणि प्रशासकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषद अधिनियम १९६१ च्या नियमांची पायमल्ली करून, सर्वसाधारण सभेचे अधिकार डावलून व आपल्या मर्जीतील लोकांना लाभ मिळवून देण्यासाठी हा निधी मंजूर करण्यात आल्याचा गंभीर आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर तरोणे यांनी केला आहे. या प्रकरणाची तक्रार थेट विभागीय आयुक्त नागपूर यांच्याकडे केली आहे.





२५ मार्च २०२६ रोजी जिल्हा नियोजन समितीने पाणीपुरवठा योजनेच्या अनुदान शीर्षक २२१५३६१४३१ अंतर्गत ९ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिली. मात्र, ही मंजुरी देताना जिल्हा परिषद अधिनियम १९६१ च्या कलम १२५ चे उल्लंघन झाल्याचे तरोणे यांचे म्हणणे आहे. नियमानुसार, कोणत्याही निधीची मागणी करताना जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत रीतसर ठराव होणे अनिवार्य असते. १८ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत १६ कोटी रुपयांच्या १९६ कामांचा ठराव घेण्यात आला होता. मात्र, जिल्हा नियोजन समितीने या ठरावात परस्पर फेरफार करत, जिल्हा परिषदेच्या अधिकारांवर गदा आणली व आपल्या मर्जीतील १२२ कामांना ९ कोटी रुपयांची मंजुरी दिली.

मुळात जिल्हा परिषदेच्या ठरावात बदल करण्याचा अधिकार डीपीसीला नसताना हा निर्णय घेतल्याने यामागे मोठा मअर्थपूर्णफ व्यवहार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## निधी आदेश रद्द करा

**नियमबाह्य पद्धतीने दिलेली ९ कोटींची प्रशासकीय मंजुरी त्वरित रद्द करावी. हा निधी कंत्राटदारांना देण्याऐवजी जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल-दुरुस्तीसाठी आणि थकीत बिलांसाठी वापरला जावा. पुन्हा शासकीय नियमानुसार आणि जिल्हा परिषदेच्या विशेष सभेचा ठराव घेऊनच नवीन कामांना मंजुरी द्यावी. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने १६ कोटींची मागणी केली होती, तर नऊ कोटींची यादी कोणी आणि कोणत्या अधिकारात तयार केली? या प्रकरणाची चौकशी होईपर्यंत निधी थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तरोणे यांनी दिला आहे**

# जिल्ह्यातील मत्स्यक्रांतीचे स्वप्न अद्यापही अधांतरी



- **१० कोटींच्या निधीची मागणी**
- **१३२६.५४ मि.मी. सरासरी पर्जन्यमान**
- **५.६४ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्र**
- **१४२१ मामा तलावाची मोजणी व सीमांकनाचा प्रस्ताव मोजणी व सीमांकन रखडले**

**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा हा तलावांचा जिल्हा आहे. मात्र तलावांची स्थिती अत्यंत गंभीर आहे. अनेक वर्षांपासून गाळ उपसण्यात आलेला नाही. त्यातच अतीक्रमण देखील वाढले आहे. त्यामुळे तलाव अखेरची घटका मोजत आहेत. परिणामी जिल्ह्यातील १४२१ मामा तलावाची मोजणी व सीमांकनाचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी तयार करण्यात आला होता. १० कोटींच्या निधीची मागणी करणारा प्रस्ताव देखील शासनाकडे गेला. परंतु, तो प्रस्ताव पूर्णत्वास आला नसल्यामुळे जिल्ह्यात मत्स्यक्रांती करण्याची घोषणा केवळ राजकीय वल्गनाच ठरली. जिल्ह्यात तलावांची संख्या मोठी आहे.

तलावांचा जिल्हा अशी राज्यस्तरावर गोंदियाची ओळख आहे. माजी मालगुजारी तलाव अद्यापही शिल्लक आहेत. मात्र वर्षानुवर्ष त्यांची दुरुस्ती आणि गाळ उपसण्यात आलेले नाही. परिणामी तलावांचे अस्तीत्व धोक्यात येत आहे. या तलावांवर जिल्ह्यातील भोई समाज मत्स्यव्यसाय करत होता. वंश परंपरागत मासेमारी करणारा भोई-ढिवर समाज उदारमतवादी धोरणामुळे आजही उपेक्षित जीवन जगत आहे. त्यामुळे हा समाज आणि त्यांच्या व्यावसायाच्या अस्तीत्वावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

या समाजाकडे पर्यायी व्यवसाय नसल्यामुळे कोट्यवधीच्या निधीची मत्स्य या समाजासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने तालुक्यात सिंचनाच्या सुविधेकडे लक्ष दिले. त्यावर कोट्यवधीच्या निधीच उधळपट्टी तर केली पण सिंचनाची व्यवस्थाच झाली नाही. व्यवसायासाठी आवश्यक उपाययोजनाही करण्यात आली नाही. त्यामुळे वंश परंपरागत मासेमारी व्यवसाय अडचणीत सापडला असून अनेकांच्या उदरनिर्वाहाचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. निम्याहून अधिक तलावांचे पाणी फार कमी झाल्याने समस्या निर्माण झाली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता जिल्ह्यातील १४२१ मामा तलावांचे अस्तित्व कायम ठेवण्याच्या उद्देशाने तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याकडे लक्ष घालत गतवर्षी मामा तलावांचे सीमांकन आणि मोजणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्यासाठी १० कोटी रुपयांची गरज भासणार आहे. तसा प्रस्ताव करून तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्याचे निर्देश मत्स्यसंवर्धन विभागाला दिले होते.

या सर्वातून भोई समाजाला मत्स्यपालन करता यावे, असा प्रामाणिक उद्देश होता. त्या घोषणेचे मच्छीमार बांधवांनी स्वागत केले होते. मात्र ती राजकीय घोषणा ठरली. ना प्रस्ताव तयार झाला, ना निधी मिळाला अशी गत झाली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मामा तलावांच्या अस्तित्वाचा प्रश्न अधांतरीच राहिला.

# वडेगाव मंडळातील शेतकरी विमा रकमेच्या प्रतीक्षेत

**तिरोडा:-** तालुक्यात खरीप पीकविमा रकमेच्या वितरणावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाच मंडळांपैकी चार महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या खात्यात महिनाभरापूर्वीच पीकविमा रक्कम जमा करण्यात आली आहे. मात्र, वडेगाव मंडळातील शेतकरी अद्यापही विमा रकमेच्या प्रतीक्षेत असल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.



वडेगाव सर्कलमधील अनेक शेतकऱ्यांनी विम्याबाबत संबंधित कंपनी तसेच टोल फ्री क्रमांकावर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये अस्वस्थता वाढत असून प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या संदर्भात प्रहार शेतकरी संघटनेने तालुका कृषी अधिकारी गेडाम व तालुका न्यायदंडाधिकारी ठाकरे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चा वडेगाव सर्कलमधील शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा रक्कम देण्याची मागणी केली. यावर प्रशासनाकडून विमा रक्कम वितरणासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. मात्र, विमा कंपनीचे अधिकारी अपेक्षित सहकार्य करीत नसल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले निवेदन तातडीने जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी कार्यालय तसेच संबंधित पीकविमा कंपनीकडे पाठविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने दिले.

## चुरडी येथे सिमेंट रस्ता बांधकामाचे भूमिपूजन

**तिरोडा-** तालुक्यातील चुरडी येथे दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले असून या कामाची किंमत अंदाजे १० लक्ष रुपये आहे.

या रस्ता बांधकामाचे भूमिपूजन गोंदिया जिल्हा परिषदेच्या सदस्या अॅड. माधुरीताई रहांगडाले यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य कविताताई सोनवणे,सरपंच श्रीमती सपनाताई ईनवाते,ग्राम पंचायत सदस्या श्रीमंती. लताताई बांते , छबिताताई मंगलदास मेश्राम, तृप्तीताई भोयर, कविताताई मेश्राम, एकनाथ सपाटे, ग्राम पंचायत सदस्य जियालाल कोकुडे,रमेश कानतोडे , दिनेश शेंडे,हिरालाल बांते तसेच गावातील नागरीक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थितीङ्कहे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच ङ्कसोमनाथङ्कचंद्राचा अधिपतीफ हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी—लाकूड आणि गवताची—असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या-१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहेङ्कसोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२-८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन ङ्गभक्ती आणि लज्जाङ्क असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२-१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केलेः ङ्गया शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.ङ्क

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला "हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.

त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माणङ्कमैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ङ्गही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारूङ्क हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे—पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो—

"आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो."

**- ब्रिजेश सिंह,**
**प्रधान सचिव तथा महासंचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# शेतकऱ्यांच्या खिशावर सरकारचा घाला

**गोंदिया:–** खतांच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, प्रति गोणी तब्बल २५ ते ३७५ रुपयांपर्यंत वाढ झाल्याने सर्व साधारण शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ९ मेपासून लागू होणाऱ्या नव्या दरांनी खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या खिशावर थेट घाव घातला आहे.

गेल्या काही वर्षांत वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी त्रस्त असताना, आता खतांच्या दरवाढीने त्यांची अडचण आणखी तीव्र झाली आहे. युरिया, डीएपी, १०:२६:२६, २०:२०:०:१३ यांसारख्या प्रमुख खतांच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. काही खतांमध्ये ३०० रुपयांपर्यंत वाढ नोंदवली गेली आहे. दरवाढीमुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी थेट शासनावर हल्लाबोल केला आहे.



## अनुदान झाले गायब

**खतांवरील अनुदान वेळेत न मिळाल्यानेच दरवाढ झाली, असा आरोप शेतकरी करत आहेत. अनुदानाची घोषणा कागदावरच राहते, प्रत्यक्षात फायदा होत नाही,अशी तीव्र प्रतिक्रिया शेतकऱ्यांचा हा जनमानसातून व्यक्त होत आहे.**

## खतांच्या किमतीत प्रचंड वाढ

### दरवाढीमागील कारणे

**तज्ज्ञांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ, आयातीवरील खर्च, लॉजिस्टिक खर्च आणि अनुदान वितरणातील विलंब ही प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. मात्र, या सर्वांचा फटका थेट शेतकऱ्यांनाच बसत असल्याने सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

### शेतकऱ्यांवर परिणाम

**रासायनिक खतांच्या दरवाढीमुळे प्रति एकर उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार, पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता, कर्जाचा बोजा वाढण्याची भीती, शेती तोट्यात जाण्याचा धोका आदी परिणाम होऊ शकतात.**

**घर चालवायचं, शेती करायची आणि आता खतांसाठी एवढे पैसे द्यायचे: सरकारने आमच्यासाठी नेमकं काय केलं? महिलांवर दुहेरी ओझं पडलं आहे. शेतीत काम करायचं आणि खर्चही पेलायचा.**

**सत्यशिला पारधी शेतकरी, सेजगाव**

**आधीच पिकांना योग्य भाव मिळत नाही. त्यात खतांच्या दरवाढीने कंबर मोडली. उत्पादन खर्च वाढला तर शेती करायची कशी? सरकारने तात्काळ हस्तक्षेप केला नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरेल.**

**रामदास पटले, शेतकरी, निलज**

# बोंडगावदेवी येथे वादळाचा कहर; जि.प.हायस्कूलचे छत उडाले



**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यात ९ मे रोजी सायंकाळच्या सुमारास आलेल्या जोरदार वादळामुळे जिल्हा परिषद हायस्कूल बोंडगावदेवी येथील शाळेचे टिनाचे छत उडून गेल्याने शाळेचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बोंडगावदेवी येथील जिल्हा परिषद हायस्कूल ही तालुक्यातील जुनी शाळा मानली जाते. संबंधित इमारत पूर्वी कौलारू स्वरूपाची होती. नंतर कवेलू काढून लाकडी बांधकामावर टिनाचे छत बसविण्यात आले होते. सुमारे १०५ फूट लांबीच्या या इमारतीमध्ये चार वर्गखोल्यांचा ब्लॉक असून, वादळी वाऱ्यामुळे संपूर्ण टिनाचे छत उडून गेले. त्यामुळे वर्गखोल्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी १० मे रोजी सकाळीच शाळेला भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी पंचायत समितीचे उपसभापती संदीप कापगते, माजी सरपंच राधेश्याम झोळे, अमरचंद ठवरे, मुख्याध्यापक अनिल कापगते, संजय गिऱ्हपुंजे, के. एस. राऊत, भुमेश्वर लंजे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

पाहणी दरम्यान जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी जि.प. उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती सुरेश हर्षे तसेच संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून नुकसानग्रस्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय तपासणी चमूकडून ग्रामपंचायतीच्या कार्याचे कौतुक




**अर्जुनी–मोरगाव:–** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५–२६ अंतर्गत तालुका स्तरीय तपासणी चमूने ग्रामपंचायत सिरेगावबांध येथे भेट देऊन ग्राम पंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची, नाविन्यपूर्ण उपक्रमांची तसेच गावातील स्वच्छता व सार्वजनिक सुविधांची सखोल पाहणी केली.

यावेळी गावातील स्वच्छ व सुंदर वातावरण, नीटनेटका परिसर, पर्यावरणपूरक उपक्रम तसेच ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून तपासणी चमूने समाधान व्यक्त करत ग्रामपंचायतीच्या कार्याचे कौतुक केले.

ग्रामपंचायत सिरेगावबांधच्या सर्व सदस्यांचे, कर्मचारी वर्गाचे तसेच गावातील प्रत्येक नागरिकाचे या अभियानात मोलाचे सहकार्य लाभले. ग्रामस्थांनी गावाच्या स्वच्छतेस प्राधान्य देत रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, अंगणवाडी व ग्रामपंचायत परिसर स्वच्छ व आकर्षक ठेवण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

तसेच गावातील महिला बचत गट, युवक मंडळ आणि ग्रामस्थांनी एकजुटीने सहभाग नोंदवून गावाच्या विकासामध्ये आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. ङ्गस्वच्छ गाव – सुंदर गाव – समृद्ध गावङ्ग या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवत ग्रामपंचायत सिरेगावबांधने विकास, स्वच्छता व लोकसहभाग यांचे उत्तम उदाहरण निर्माण केल्याचे गौरवोद्गार तपासणी चमूने यावेळी काढले.

ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे आणि ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गाव प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी होण्यासाठी तपासणी चमूकडून शुभेच्छा देण्यात आल्या.दरम्यान, ग्रामपंचायत सिरेगावबांधच्या वतीने सर्व ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक मंडळ, कर्मचारी वर्ग तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# मोहगाव बुजरुक ग्राम पंचायतीची चमूकडून तपासणी




**गोरेगाव :–** तालुक्यातील मोहगाव बुजरुक ग्रामपंचायतीद्वारे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत करण्यात आलेल्या कामाची तपासणी पंचायत समिती घाटंजी (जि. यवतमाळ) येथील तालुकास्तरीय समितीने केली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभागी झालेल्या व प्रत्यक्षात राबविण्यात आलेल्या कामाची तपासणी करण्यासाठी शुक्रवारी (ता. ८) तालुकास्तरीय समिती मोहगाव बुजरुक येथे तपासणीकरिता आली. या समितीने राबविण्यात आलेल्या विकासात्मक व लोकसहभागातून केलेल्या कामाची पाहणी करत संबंधित दस्तावेज तपासले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५–२६ अंतर्गत तालुकास्तरीय तपासणी समितीनेकामकाजाचे मूल्यांकन करून विकासात्मक व लोकसहभागाच्या माध्यमातील सुशानयुक्त पंचायत, सक्षम पंचायत (लोकवर्गणी), जलसमृद्ध व हरित गाव, मनरेगा अभिसरण, गाव पातळीवरील संस्थासक्षमीकरण, उपजिविका, लोकसहभाग व नावीण्यपूर्ण उपक्रम आदींची पाहणी केली. यावेळी सरपंच, उपसरपंच, सदस्य, पंचायत समिती पदाधिकारी, कर्मचारी, बचतगटाचे पदाधिकारी व गावकरी उपस्थित होते.

# दिशा समितीची बैठक बुधवारी

**गोंदिय :–** भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक बुधवारी दिनांक १३ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

यावेळी खासदार डॉ. प्रशांत पडोळे हे नरेगा, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री पीक विमा योजना, राष्ट्रीय शिक्षा अभियान, यासह ३७ विषयांचा आढावा घेणार आहेत.

दिशा समिती ही केंद्र सरकारच्या योजनांवर देखरेख ठेवणारी अत्यंत महत्वाची समिती असून, या समितीच्या माध्यमातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी, निधीचा योग्य वापर, कामांची गुणवत्ता आणि पारदर्शकता यावर भर दिला जातो.

गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या मार्गी लावणे, विकासकामांना गती देणे आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनविणे हा या दिशा समिती बैठकीचा मुख्य उद्देश आहे. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्यासह यंत्रणांचे जिल्हा प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांना घेऊन धरणे आंदोलन




**गोंदिया:–** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने (आयटक )च्यावतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच इतर मागण्यांना घेऊन (दि.११)कडकत्या उन्हात जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.त्यानंतर मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्याचे नावे असलेले विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आले.

आंदोलनाचे नेतृत्व राज्य महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष मिलिंद गणवीर, जिल्हाध्यक्ष चत्रूघन लांजेवार, कार्यकारी अध्यक्ष महेंद्र कटरे आणि जिल्हा सचिव रवी किटे यांनी केले.जिल्हा परिषद प्रशासनाशी संबंधित २९ मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांना सादर करण्यात आले.

मागण्यांमध्ये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मिळाल्यापासून एका आठवड्याच्या आत त्याचे वितरण, कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचे पालन, दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत किमान वेतन, भत्ते आणि भविष्य निर्वाह निधीचा पुरवठा, साप्ताहिक आणि वार्षिक पगारी रजा, अपघात विमा सह शासन निर्णया प्रमाणे पं. स. स्तरावर वर्षात ३ व जि. प. स्तरावर वर्षात २ तक्रार निवारण समितीच्या सभा घेणे कर्मचाऱ्याच्या सेवा शर्तीचे पालन करने व याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करणे आदीचा समावेश आहे.मिलिंद गणवीर यांनी आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात ८ जूनपासून नागपूरमधील मुख्यमंत्री सचिवालय समक्ष होणार असल्याची घोषणा करीत सहभागी होण्याचे आवाहन केले.या आंदोलनात आयटक जिल्हा सचिव रामचंद्र पाटील, महासंघाचे बुधराम बोपचे, ईश्वरदास भंडारी, विष्णू हत्तीमारे, महेंद्र भोयर, भाऊलाल कटंगकर, विनोद शहारे, कु.दिप्ती राणे, देवेंद्र मेश्राम, मनोज जनबंधू, गजेंद्र हिरवाणी, तुलसीदास चौधरी, लोमेश कुमार यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार प्रतिनिधींना डावलून ग्रामपंचायत मूल्यांकन?

## आमगाव पंचायत समितीतील समिती गठनावर प्रश्नचिन्ह; शासन आदेश धाब्यावर?

**आमगाव:–** राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान" अंतर्गत ग्रामपंचायतींचे तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर मूल्यांकन करून उत्कृष्ट ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यासाठी शासनाने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. शासन निर्णयानुसार तालुका व जिल्हास्तरीय मूल्यांकन समित्यांमध्ये विविध विभागीय अधिकाऱ्यांसह पत्रकार प्रतिनिधींचा समावेश अनिवार्य करण्यात आला होता. मात्र गोंदिया जिल्ह्यातील आमगाव पंचायत समितीमध्ये या आदेशाचे पालन झाले नसल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.




शासन निर्णयानुसार तालुकास्तरीय मूल्यांकन समितीत "तालुकास्तर पत्रकार संघाच्या वतीने निवडलेले एक प्रतिनिधी" सदस्य म्हणून नियुक्त करणे बंधनकारक होते. तरीही आमगाव पंचायत समितीचे खंड विकास अधिकारी एन. बी. गुट्टावार यांनी पत्रकार प्रतिनिधींना डावलून परस्पर समिती गठीत केल्याचा आरोप पत्रकार प्रतिनिधी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

माहितीनुसार, शासनाच्या आदेशानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर समित्या गठीत करून ग्रामपंचायतींच्या मूल्यांकनासाठी समन्वय साधणे, नियोजन करणे व प्रत्यक्ष निरीक्षण करणे अपेक्षित होते. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकार प्रतिनिधींना समितीत स्थान देण्यामागे मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकता राहावी, निष्पक्ष निरीक्षण व्हावे आणि शिफारशी किंवा संगणमताला आळा बसावा हा शासनाचा उद्देश होता. मात्र आमगाव पंचायत समितीत याच प्रतिनिधींना वगळण्यात आल्याने संपूर्ण प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे, पत्रकार प्रतिनिधींना डावलून अकोला जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींचे मूल्यांकन करण्यात आल्याची माहिती पुढे आली असून, हे मूल्यांकन कोणत्या समितीमार्फत करण्यात आले, पत्रकारांच्या जागी कुणी प्रतिनिधित्व केले, समितीची अधिकृत मंजुरी होती का, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

पत्रकार संघटनांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, ङ्गशासन आदेश असताना पत्रकार प्रतिनिधींना का वगळण्यात आले? नियमबाह्य पद्धतीने गठीत समिती वैध मानली जाऊ शकते का?ङ्ग असा सवाल उपस्थित केला आहे. तसेच मूल्यांकन प्रक्रियेत संगणमत, सिफारशी किंवा पक्षपातीपणा झाला नसल्याची खात्री कोण देणार, असा प्रश्नही नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

दरम्यान, आमगाव पंचायत समितीचे खंड विकास अधिकारी एन. बी. गुट्टावार यांनी गठीत केलेली समिती नियमसंगत होती का, याची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे पदाधिकारी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सत्यस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पत्रकार प्रतिनिधी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे "मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान" अंतर्गत होणाऱ्या मूल्यांकन प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या मजुरावर अस्वलाचा जीवघेणा हल्ला

**गोंदिया –** जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात लोक जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करत असतात. अशातच अर्जुनी मोरगाव तालुक्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटना सातत्याने वाढत आहेत. मागील चार दिवसांत तिसरी गंभीर घटना घडल्यानं संपूर्ण तालुका हादरला आहे. तेंदूपत्ता संकलनासाठी जंगलात गेलेल्या एका मजुरावर अस्वलाने अचानक जीवघेणा हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना १२ मे रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास घडली. तीरखुरी सहवन क्षेत्र भाग क्रमांक ९ अंतर्गत नियत क्षेत्र क्रमांक ३ मधील भरणोली जंगल परिसरात ही घटना घडली. या घटनेत दीपक रतिराम गावळे (वय ४०) रा. भरणोली हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर सध्या केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.सकाळी तेंदूपत्ता गोळा करण्याचं काम सुरू असताना दाट जंगल परिसरातून अचानक अस्वल बाहेर आलं आणि दीपक गावळे यांच्यावर हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. अस्वलाने गावळे यांच्या मांडीवर, शरीराच्या इतर भागांवर गंभीर जखमा केल्याचं सांगण्यात येत आहे. त्यांच्यासोबत असलेल्या इतर मजुरांनी आरडाओरड करत मदतीसाठी धाव घेतली. मजुरांच्या आरडा ओरडीमुळे अस्वल जंगलाच्या दिशेने पसार झाले.

# निलंबित मुख्याध्यापिकेचा संस्थाचालकांविरुद्ध गंभीर छळाचा आरोप

**सालेकसा:–** तालुक्यातील सातगाव (साखरीटोला) येथील श्रीविद्या गर्ल्स हायस्कूलमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शाळेच्या निलंबित मुख्याध्यापिका श्रीमती अजया जागेश्वर चुटे यांनी संस्थाचालक आणि काही कर्मचाऱ्यांविरुद्ध मानसिक व शारीरिक छळाचा खळबळजनक आरोप केला आहे. ४५ अंश सेल्सिअस तापमानात भरउन्हात उभे राहण्यास भाग पाडल्याचा दावा करत त्यांनी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे न्यायाची मागणी केली आहे.

सविस्तर असे की, श्रीमती चुटे यांना ६ जानेवारी २०२६ पासून निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरोधात चौकशी सुरू आहे. मात्र, ही चौकशी सूडबुद्धीने केली जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे, २७ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत झालेल्या चौकशी दरम्यान, कडक उन्हाचा कडाका असतानाही त्यांना सकाळी ९:०५ ते १०:१५ वाजेपर्यंत शाळेच्या प्रांगणात उभे राहण्यास सक्ती करण्यात आली. या अमानवीय वागणुकीमुळे त्यांची प्रकृती खालावली असून त्यांना उच्च रक्तदाब आणि इतर शारीरिक व्याधींचा त्रास सुरू झाला आहे. डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला असला तरी, केवळ छळ करण्याच्या हेतूने त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याची सक्ती केली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केवळ शारीरिक छळच नव्हे, तर शाळेच्या आवारात बसण्यास मनाई करणे, हजेरी रजिस्टर देण्यास टाळाटाळ करणे आणि इतर कर्मचाऱ्यांमार्फत अपमानित करण्याचे प्रकारही शाळेत घडत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. श्रीमती चुटे या विधवा असून त्यांच्यावर दोन मुलींच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. 'जर या छळामुळे माझ्या जिवाचे काही बरेवाईट झाले, तर त्यास शिक्षण विभाग आणि संबंधित संस्थाचालक सर्वस्वी जबाबदार राहतील,' असा गंभीर इशाराही त्यांनी दिला आहे.

यापूर्वी १९ फेब्रुवारीला तक्रार करूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आता त्यांनी फोटो आणि वैद्यकीय प्रमाणपत्रांसह जिल्हा शिक्षणाधिकारी आणि विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्याकडे धाव घेतली आहे. या घटनेमुळे शैक्षणिक वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# सौंदड मार्गावर वाहतूक कोंडी कायम

**कोहमारा :–** मुंबई–कोलकत्ता राष्ट्रीय महामार्गावरील सौंदड रेल्वे क्रॉसिंगदरम्यान वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. मात्र, कधी कधी आठ तास ट्राफिक जाम राहत असल्याने वाहन चालकांना फटका बसत असून, प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. उड्डाणपुलाचे काम जलद गतीने करण्याची मागणी स्थानिक नागरिक व प्रवाशांनी केली आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातून गेलेला मुंबई कोलकत्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ हा मध्यपूर्व तसेच दक्षिण भारताला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गाचे चौपदरीकरण झाल्याने प्रवासी वाहनासह कारखान्याला कच्चा माल पुरविणारे अवजड वाहन, कार्गो वाहने या मार्गावरून रोज धावत असतात. याच मार्गावर



सौंदडजवळ गोंदिया–बल्लारशा रेल्वे मार्ग गेला आहे.

या मार्गावरून प्रवासी व सुपरफास्ट रेल्वे गाड्यांसह मालगाड्या सुद्धा मोठ्या प्रमाणावर धावतात. मात्र, रेल्वे लाईनदरम्यान उड्डाणपुलाअभावी रेल्वेच्या अनेकदा रेल्वे गेट बंद करावे लागते. चौपदरीकरण मार्गाचे सौंदड दरम्यान एकेरी मार्गात रूपांतर होते. सर्वच वाहनधारकांना घाई असल्याने एकाच वेळी पादचारी असो, सायकल, दुचाकीस्वार, चार चाकी वाहने पुढे पुढे रेटत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते.

कधी कधी तर रेल्वे रुळ दुरुस्तीचे कामासाठी रेल्वे गेट बंद असल्याने पाच सहा तास वाहतूक ठप्प होऊन दहा किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वाहतूक सुरळीत करण्यासाठी कंत्राटदाराकडून खासगी सुरक्षारक्षक ठेवले आहेत. मात्र, वाहनधारक त्यांचे ऐकत नसल्याने गोंधळात अधिकच भर पडत आहे.

## नागरिकांना होतोय त्रास

**अंतर्गत गाव रस्ते अतिशय अरुंद वळणदार व थेट गावातूनच गेल्याने जड वाहनामुळे येथील गावकऱ्यांनाही त्रास सहन करावा लागतो. यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, पोलिस विभाग, महामार्ग प्राधिकरण, स्थानिक प्रशासन या बाबीकडे कोणतेही लक्ष देत नसून प्रवाशांना होणारा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सौंदड येथील उड्डाणपुलाचे काम जलद गतीने पूर्ण करावे व भूमिगत पुलाचे काम सुद्धा काम जलद गतीने करा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.**

## उड्डाणपुलाचे काम जलदगतीने पूर्ण करा

**नागपूर–गोंदियाकडे धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसेस तसेच खासगी ट्रॅव्हल्स वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा विचार करून, तर कधी कधी प्रवास यांच्या आग्रहाखातर विरुद्ध मार्गाचा वापर करतात. मात्र, दुर्दैवाने बसचा काही अपघात झालाच तर चालक वाहकांना नोकरी गमावण्याची वेळ येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कधी कधी वाहनधारकांना जाम लागल्याची माहिती मिळताच वाहन वळवून चिखली–राका –सौंदड–चारगाव फाट्यावरून साकोलीकडे जातात. तर काही बसेस बिरसी फाट्यावरून मुरदोली मार्गे गोंदियाकडे जातात. परिणामी, प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो.**

# डॉ.बाजेपयीचा न्यू बालाजी सोनोग्राफी सेंटर केले सील!रुग्णालयाची परवानगीही रद्द

**गोंदिया :–** रामनगर पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या न्यू बालाजी सोनोग्राफी सेंटरची तत्काळ चौकशी करून मशीन सील करण्याबाबतचे रामनगर पोलिसांचे पत्र जिल्हा शल्यचिकित्सकांना पोहोचताच सोमवारी (दि. ४) त्यांच्या आदेशानुसार पथकाने डॉ. नितेश बाजपाई याचे न्यू बालाजी सोनोग्राफी सेंटर सील केले.

येथील डॉ. नितेश बाजपाई याने मध्य प्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यातील अनेक महिला व तरुणींचे बाळंतपण आपल्या रुग्णालयात करून अनैतिक संबंधातून जन्माला आलेले बाळ लोकांना ४–४ लाखांत विक्री केले. याप्रकरणी भंडारा जिल्ह्यातील साकोली व येथील रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामनगर पोलिस ठाण्यात डॉ. बाजपाई याच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत. या सोनोग्राफी सेंटरची रामनगर पोलिसांनी तपासणी केल्यावर त्याठिकाणी त्यांना काही कागदपत्रे न मिळाल्याने रामनगर पोलिसांनी १५ एप्रिल रोजी डॉ. पटले यांना पत्र पाठवून डॉ. बाजपेयी यांचे सोनोग्राफी सेंटर सील करण्याची विनंती केली. त्यानुसार सोमवारी (दि. ४) डॉ. पटले यांच्या सूचनेवरून निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. बी. डी.जायस्वाल, ॲड. रेखा कानतोडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. भारती किल्लासर, डॉ. संजय भगत, डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी केली.




## रेकॉर्ड गेले कुठे?

**या केंद्राच्या चौकशी दरम्यान पोलिसांना कोणतेही रेकॉर्ड मिळाले नाही.पीसीपीएनडीटी कायदा १९९४ कलम ५,६ व नियम २ (८) आणि १० अंतर्गत सर्व दस्तावेज ठेवणे अनिवार्य आहे. तरी या केंद्राची तपासणी करून रेकॉर्ड नसल्यास केंद्र सील करून समितीने सील केल्याचा अहवाल दोन दिवसांच्या आत देण्याचे पत्र रामनगर पोलिसांनी दिले होते. बाजपेयी यांचे काळे कारनामे असलेली कागदपत्रे गायब करण्यात आली आहेत.**

न्यू बालाजी सोनोग्राफी सेंटर सुरू करण्याची परवानगी ८ सप्टेंबर २०२५ रोजी देण्यात आली होती, या केंद्राचा नोंदणी क्र. झउझछउद्ध/ऋ/४७/२०२५ संदर्भ क्रमांक– १ आणि २ नुसार नितेश बाजपेई विरुद्ध पोलिस ठाणे वरठी (जि. भंडारा) अणि पोलिस ठाणे रामनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे महिनाभरापूर्वी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पटले यांनी न्यू बालाजी नर्सिंग होमची मान्यता रद्द केली आहे.

